# राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळमजला, पुणे - ४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१

ई -: मेल आयडी-sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/जि.म.स.बँ./निवडणुक /मा.सु./२०१९

दिनांक : /१२/२०१९

19 DEC 2019 8892

प्रति,

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी

तथा विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व)

**विषय : जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या समिती निवडणुक प्रक्रीयेबाबत अनुसरावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना**

**वाचा :** १) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४

२) महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) (प्रथम सुधारणा) नियम २०१७

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या मार्गदर्शन सुचना जाक्र रासनिप्रा/कक्ष-११/जिमसबँक/ निवडणूक/ मा.सु. / ८६२१ सन २०१९ दि. १०.१२.२०१९ याकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

उपरोक्त मार्गदर्शक सुचनांमध्ये जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांनी करावयाची कार्यवाही या मार्गदर्शन सूचनांमधील अनुक्रम क्र २(iii) मधील शेवटचे वाक्यामध्ये मूळ मार्गदर्शक सूचनांऐवजी खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत आलेल्या मार्गदर्शक सूचना अनुक्रम क्रमांक तीन मध्ये नमूद केल्याप्रमाणे वाचण्यात यावे.

| अ. क्र. | मूळ मार्गदर्शक सूचनांमधील तपशील | बदल केल्याप्रमाणे वाचावयाचा तपशील | शेरा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | त्यानुसार एकदा पाठविलेल्या प्रतिनिधीचा मृत्यु झाल्यास अथवा संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ गठीत झाल्यासच ठरावात बदल करुन नवीन प्रतिनिधी चे नाव **प्रारूप मतदार यादी प्रसिध्द करणेपूर्वी** सूचविता येईल याची सर्व संबंधीतांना पत्राव्दारे कल्पना देण्यात यावी | त्यानुसार एकदा पाठविलेल्या प्रतिनिधीचा मृत्यु झाल्यास अथवा संस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक होऊन नवीन संचालक मंडळ गठीत झाल्यासच ठरावात बदल करुन नवीन प्रतिनिधीचे नाव **नामनिर्देशन करण्याच्या शेवटच्या दिनांकापुर्वी पाच दिवसाच्या आंत** सूचविता येईल | |

या अनुषंगाने सर्व संबंधीतांना सदरची बाब अवगत करण्यात यावी. वरीलप्रमाणे मार्गदर्शक सुचनामधील बदल विचारात घेऊन कार्यवाही करण्यात यावी. तसेच ह्या मार्गदर्शक सुचनांतील बदल निवडणुकीस पात्र सर्व सदस्य सहकारी संस्थांनाही अवगत कराव्यात.

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, पूणे यांच्या आदेशानुसार.**

१९/१२/१९

(यशवंत गिरी)

सचिव

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,

महाराष्ट्र राज्य , पुणे.

**प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव :-**

१.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक म.मुंबई

२. कार्यकारी संचालक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म. (सर्व)